निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २५९ वा.
रविवार :२३ नोव्हेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंडे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## धडक तरीही ताफा पुढेच: जबाबदारीचा प्रश्न अनुत्तरितच

### उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या ताफ्यातील अग्नीशामक दलाच्या गाडीने मोटारसायकलस्वार जोरदार धडकेने गंभीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**धारूर/प्रतिनिधी**/बीड जिल्ह्यात उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पालकमंत्र्यांच्या ताफ्यातील अग्नीशामक दलाच्या गाडीने मोटारसायकलला दिलेल्या जोरदार धडकेने गंभीर अपघात घडल्याने स्थानिकांत संताप उसळला आहे. धूणकवड फाटा परिसरात घडलेल्या या दुर्घटनेत नवरा-बायको आणि दोन लहान मुलांसहित संपूर्ण कुटुंब गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनास्थळावर रक्ताचे डाग, मोडकळीस आलेली दुचाकी आणि थरथर कापणारे प्रत्यक्षदर्शी या सगळ्यांनी त्या क्षणाची भीषणता स्पष्ट होते.



**मोठ्यांच्या ताफ्यातून अपघात म्हणजे काहीच नसतं - नागरिकांचा सूर**

स्थानिकांचा सूर स्पष्ट होता - गरीब माणसाचा जीव म्हणजे काही किंमत नाही काय? मोठ्या माणसांच्या ताफ्यातून काही झालं तर चौकशीही होत नाही.

**स्थानिकांमध्ये एकच चर्चा -**

न्याय मिळेल का, की हा प्रकारही गप्पच दडपला जाईल?

ताफा न थांबण्याचा आरोप

स्थानिकांच्या मते, धडक दिल्यानंतर संपूर्ण ताफा एकदाही न थांबता पुढे सरकला.प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.गाडीने जोराची धडक दिली. लोक ओरडत होते, पण ताफा कुठेच थांबला नाही. धूळ उडत होती आणि जखमी वेदनेने तडफडत होते.अशा प्रकारच्या सरकारी ताफ्यातून झालेल्या अपघातानंतर जबाबदार व्यक्ती किंवा अधिकारी त्वरित मदतीला धावून येणे अपेक्षित असते. मात्र प्रत्यक्ष परिस्थितीत उलटच घडल्याचा आरोप स्थानिकांनी जोरदारपणे केला आहे. उपमुख्यमंत्र्यांनी किंवा प्रशासनातील वरिष्ठांनी जखमींची भेट घेतली नाही किंवा विचारपूस केली नाही, यामुळे नागरिकांच्या भावनांना आणखी तडे गेले आहेत.



ग्रामीण भागातील लोकांमध्ये यापूर्वीही अशा घटनांबद्दल तक्रारी आहेत. शेतकरी, मजूर आणि दैनंदिन कामगार वर्गातील लोकांना न्याय मिळण्यास विलंब होतो किंवा तो मिळतच नाही, अशी भावना अधिक तीव्र झाली आहे.

प्रशासनाकडून चौकशीचे संकेत नाहीत

दुर्घटनेनंतर पोलिस किंवा प्रशासनाकडून तत्काळ चौकशी सुरू झाली असल्याचे स्पष्ट संकेत मिळत नाहीत. अपघातात जबाबदार वाहन सरकारी ताफ्यातील असल्यामुळे प्रक्रिया अधिक पारदर्शकपणे आणि त्वरित व्हायला हवी होती, असे नागरिकांचे मत आहे. काही स्थानिकांनी तर असा सवाल उपस्थित केला आहे की,

सामान्य माणसाने असा अपघात केला असता, तर त्याला लगेच अटक झाली असती; मग इथे वेगळे नियम का?

उपमुख्यमंत्र्यांनी दखल घेणार का?

नागरिकांचा मुख्य प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार या घटनेची स्वतः दखल घेतील का?सरकारी ताफ्यातील गाडीने गरीब कुटुंबाला धडक दिली, त्यात लहान मुलेही आहेत, अशा परिस्थितीत किमान सहानुभूती, चौकशी आणि जबाबदारीची अपेक्षा जनतेला स्वाभाविक आहे.दुर्घटना गंभीर आहे. जखमी कुटुंबाला मदत, दोषींवर कारवाई आणि घटनेच्या सखोल चौकशीबाबत निर्णय तातडीने घोषित होण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.



## शिंदे-फडणवीस 'अंतर' फोटोवरून राजकीय चर्चा; अखेर उचजचे स्पष्टीकरण

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई (प्रतिनिधी)** मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया येथे दिव्यज फाऊंडेशनच्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे एकमेकांपासून दोन खुर्च्यांच्या अंतरावर बसल्याचा फोटो व्हायरल झाला.

यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये नाराजी असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात चांगल्याच रंगल्या. अलीकडेच शिंदे यांनी दिल्लीत अमित शहांची भेट घेऊन राज्यातील भाजप नेत्यांविषयी नाराजी व्यक्त केल्याची चर्चा सुरू होती. त्यामुळे कार्यक्रमातील 'दूर बसणे' या घटनेला अधिक रंग मिळाला.

तथापि,मुख्यमंत्री कार्यालयाने यावर औपचारिक स्पष्टीकरण देत कोणताही दुरावा नसल्याचे सांगितले.

उचजनुसार-कार्यक्रमातील आसनव्यवस्था पूर्वनियोजित होती.शिंदे आणि फडणवीस यांच्या मध्ये असलेल्या दोन खुर्च्या मुकेश आणि नीता अंबानी यांच्यासाठी राखून ठेवण्यात आल्या होत्या.प्रत्येक खुर्चीवर पाहुण्यांची नावे लिहिलेली असल्याने बदल करणे शक्य नव्हते.फडणवीस आधीच कार्यक्रमस्थळी उपस्थित होते. शिंदे आल्यानंतर त्यांनी फडणवीस यांना नमस्कार केला. फडणवीस यांनीही उभे राहून त्यांचे स्वागत केले. त्यानंतरही शिंदे यांनी नियोजित जागाच घेतली, ज्यामुळे दोन खुर्च्यांचे अंतर दिसून आले.या फोटोवरून निर्माण झालेला 'नाराजी' वाद उचजच्या स्पष्टीकरणामुळे निवळल्याचे मानले जाते.

## महानगरपालिका निवडणूक मतदार यादी संबंधी २७ नोव्हेंबरपर्यंत हरकती व सूचना दाखल करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी** / महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदार याद्यांचे प्रभागनिहाय विभाजन संबंधित महानगरपालिका आयुक्त स्तरावर केले आहे. याबाबत काही हरकती व सूचना किंवा तक्रारी असल्यास दि. २७ नोव्हेंबर २०२५ रोजीपर्यंत संबंधित महानगरपालिकेत दाखल कराव्यात, असे आवाहन राज्य निवडणूक आयोगाने केले आहे.

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्यांकरिता १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित केला असून, त्या दिवशी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार याद्या या निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहेत. या मूळ मतदार याद्या भारत निवडणूक आयोगाने तयार केल्या आहेत. त्यांचे प्रभागनिहाय विभाजन संबंधित महानगरपालिका स्तरावर महानगरपालिका आयुक्तांच्या देखरेखीखाली करण्यात आले आहे. त्यानुसार २० नोव्हेंबर २०२५ रोजी संबंधित महानगरपालिकेच्या ठिकाणी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. त्यातील मतदारांचे नाव https://mahasecvoterlist.in या संकेतस्थळावर पाहता येईल. त्यावर २७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील.

प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करताना विधानसभा मतदारसंघाच्या यादीप्रमाणेच मतदार याद्यांमध्ये मतदारांची नावे व पत्ते कायम ठेवले जातात. प्रभागनिहाय मतदार याद्यांमध्ये नवीन नावांचा समावेश करणे, नावे वगळणे अथवा नावे किंवा पत्त्यांमध्ये दुरूस्ती करणे इ. स्वरूपाची कार्यवाही केली जात नाही. मतदार याद्यांचे प्रभागनिहाय विभाजन करताना लेखनिकांकडून होणाऱ्या चुकांसंदर्भात, तसेच मतदाराचा चुकून प्रभाग बदलणे, विधानसभेच्या यादीत नाव असूनही प्रभागाच्या यादीत नाव नसणे आदींसंदर्भातील हरकती व सूचना महानगरपालिका आयुक्तांकडे दाखल करता येतील, असेही राज्य निवडणूक आयोगाने कळविले आहे.

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

## पोटच्या मुलाने जन्मदात्या बापाचा खून करून घरातच खड्डा खोदून पुरला मृतदेह

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण / प्रतिनिधी**/ तालुक्यातील कडेठाण येथे घडलेली ही घटना अत्यंत धक्कादायक आहे. या प्रकरणात, वयाने ६५ वर्षांचे कल्याण बाबुराव काळे यांचे हत्या करून त्यांचा मुलगा रामेश्वर काळे (वय ३८) यांनी घरातच खड्डा खोदून मृतदेह दफन केला होता. हे खून आठ दिवसांपूर्वीच केले गेले होते, मात्र दुर्गंधी निर्माण झाल्यामुळे घटना बाहेर आली. घटनास्थळी पोलीसांनी तपासणी केली आणि वैद्यकीय पथकाच्या उपस्थितीत मृतदेह बाहेर काढण्यात आला. पाचोड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पंडित यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल व पोलीस पथकासह घटनास्थळी पाहणी केली. मृतक कल्याण बाबुराव काळे यांचा मृतदेह सडत असल्यामुळे घरात दुर्गंधी पसरली होती, ज्यामुळे मयताची पत्नी हे प्रकरण लक्षात घेऊन नातेवाईकांना माहिती दिली आणि त्यांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवली.

**कड़ेठाण येथील धक्कादायक घटना : आठ दिवसापूर्वी केला होता खून**





सुरुवातीच्या तपासात असे समजते की, रामेश्वर आणि त्याचे वडील यांच्यात काही कारणास्तव वाद झाला होता आणि रागाच्या भरात रामेश्वरने आपला वडील ठार केला. खून केल्यानंतर रामेश्वरने लगेच मृतदेह घरात खड्डा खोदून दफन केला. मृतदेह आठ दिवस घरात सडत राहिला, ज्यामुळे दुर्गंधी पसरली आणि शेवटी घटना उघडकीस आली.सध्या आरोपी मुलगा रामेश्वर काळे पोलिसांच्या ताब्यात असून, पुढील तपास सुरू आहे. पोलीस मृतकाच्या कुटुंबीयांची चौकशी करत आहेत आणि घटनास्थळी सापडलेली कोणतीही पुरावे गोळा करून न्यायालयीन कार्यवाहीसाठी तयार करत आहेत. या घटनेमुळे परिसरात मोठा धक्का बसला असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. हा प्रकार कौटुंबिक वाद, संताप आणि हिंसाचाराच्या गंभीर परिणामांचे उदाहरण ठरतो. तसेच, या घटनेतून समाजातल्या हिंसात्मक वर्तनाविषयी आणि घरगुती वादाचे नियमन करण्याच्या गरजेवर प्रकाश पडतो.

## शासकीय परिचारिका महाविद्यालयात पॉश कायदा व सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** शासकीय परिचारिका महाविद्यालय, जालना येथे महिला व मुलींच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढवण्यासाठी लैंगिक छळ प्रतिबंध (पॉश कायदा) आणि सायबर क्राईम संरक्षण या विषयावर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

हा उपक्रम महिला समुपदेशन केंद्र व कदिम जालना पोलिस स्टेशन यांच्या वतीने राबविण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. एकनाथ गावडे होते, प्रमुख उपस्थिती डॉ. राजेंद्र शिंदे यांनी ठेवली, तर आभार प्रदर्शन डॉ. शरद डिघे यांनी केले. प्रमुख पाहुणे व समुपदेशक रोहित म्हस्के यांनी विद्यार्थ्यांना महिलांच्या सुरक्षिततेसंबंधी सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात पॉश कायदा २०१३ अंतर्गत कार्यस्थळी लैंगिक छळाची व्याख्या, तक्रार नोंदणी प्रक्रिया, कालमर्यादा, अंतर्गत तक्रार समिती (ICC) ची जबाबदारी, प्रतिशोधविरोधी संरक्षण आणि महिलांना मिळणारा कायदेशीर व मानसिक आधार यावर मार्गदर्शन करण्यात आले.साथसंगीत सायबर सुरक्षा मार्गदर्शनामध्ये फिशिंग, ओटीपी/UPI फसवणूक, सोशल मीडिया हॅकिंगची लक्षणे, संशयास्पद लिंक व कॉलची ओळख, महिलांवर होणाऱ्या सायबर छळाचे उदाहरणे आणि प्रतिबंधात्मक उपाय, मोबाईल व सोशल मीडिया अकाउंटची सुरक्षा, तसेच cybercrime.gov.in पोर्टल व स्थानिक सायबर सेलवर तक्रार नोंदविण्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली गेली.




विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तर सत्रात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. आयोजकांचा विश्वास आहे की या कार्यक्रमामुळे महाविद्यालयात महिलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण होईल आणि पॉश कायदा व सायबर सुरक्षा विषयक जागरूकता वाढेल.

## नागरिकांनी सजग आणि सतर्क राहून देश सुरक्षेचे कान आणि डोळे व्हावे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/ दहशतवादाविरुद्धचे युद्ध संपलेले नाही. या दहशतवादाच्या विरोधात लढण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सजग आणि सतर्क असले पाहिजे. कान आणि डोळे बनून सुरक्षेचे काम केले पाहिजे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. दिवीजा फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या ग्लोबल पीस ऑनर कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी राष्ट्रीय तपास यंत्रणेचे प्रमुख डॉ. सदानंद दाते, एनएसजी कमांडो सुनिल जोधा, रिलायन्स फाऊंडेशनच्या अध्यक्ष नीता अंबानी यांना ग्लोबल पीस ऑनर सन्मानाने गौरवण्यात आले.

२६/११ या काळजाला भिडणाऱ्या घटनेला १७ वर्षे झाली असली तरी त्या दिवसाची वेदना आजही आपणा सर्वांच्या मनात कायम असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईसह देशभरात भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या या हल्ल्यातील शहीदांना आदरांजली देण्यासाठी आणि हुतात्म्यांच्या स्मृती ताज्या ठेवण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वाचा आहे. पहलगाम येथे निष्पाप नागरिकांची हत्या करून दहशतवादी संघटना देशात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा घटनांवरून आजही दहशतवादाचा धोका कायम असल्याचे स्पष्ट होत असून, प्रत्येक नागरिकाने सतर्क राहणे अत्यंत गरजेचे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २६/११ चा हल्ला हा ताज किंवा मुंबईपुरता मर्यादित नव्हता. जसा अमेरिका 'ट्विन टॉवर' हल्ला म्हणजे अमेरिकेच्या सार्वभौमत्वावरील हल्ला होता, तसाच २६/११ चा हल्ला हा संपूर्ण भारताच्या सार्वभौमत्वाला दिलेला मोठा धक्का होता. त्या काळात ठोस प्रतिउत्तर दिले असते तर कदाचित पुन्हा असा हल्ला झाला नसता. परंतु आता परिस्थिती बदलली असून भारत मजबूत, सक्षम आणि निर्णायक देश म्हणून जगासमोर उभा आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर कारवाई करत जगाला आपली क्षमता दाखवून दिली. भारत निर्णायक कारवाई करणारा देश आहे. आज देशाची सुरक्षा यंत्रणा अत्यंत मजबूत झाली आहे. दिल्ली बॉम्बस्फोटापूर्वी सुरक्षा यंत्रणांनी मोठ्या प्रमाणात स्फोटक पदार्थ आणि शस्त्रे जप्त करून मोठा कट उधळून लावला आहे.

दहशतवादी सरळ युद्ध करू शकत नाहीत म्हणून छुपे युद्ध सुरू आहे. अशा परिस्थितीत देशातील प्रत्येक नागरिकाने सतत जागरूक राहणे गरजेचे आहे. आजच्या दिवशी शहीद हेमंत करकरे, अशोक कामटे, विजय साळसकर, तुकाराम ओंबाळे, मेजर उन्नीकृष्णन आणि प्रकाश मोरे यांसह सर्व शूरवीरांना विनम्र अभिवादन करतो.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, २६/११ हल्ल्यात मुंबईची संस्कृती, तिचा आत्मा आणि तिची ओळख लक्ष्य करण्यात आली होती. पण मुंबई थांबली नाही आणि खचली नाही. आपण या हल्ल्याला ठाम प्रत्युत्तर दिले. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला दिलेले उत्तर हे देशाच्या बदललेल्या सामर्थ्याचे द्योतक आहे.सदानंद दाते आणि नीता अंबानी यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांनी सांगितले की, अशा व्यक्तींचा देशाला अभिमान आहे.कार्यक्रमात २६/११ हल्ल्यात अतुलनीय धैर्य दाखवणारे वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि राष्ट्रीय तपास यंत्रणेचे प्रमुख डॉ. सदानंद दाते यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

**सविस्तर वृत्त पान २ वर...**

# गरीब माणसाचा जीव म्हणजे काही किंमत नाही काय?

**बीड जिल्ह्यातील धूणकवड फाटा परिसरात झालेल्या अपघाताने पुन्हा एकदा नागरिकांच्या मनात शंका आणि संतापाची लाट निर्माण केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या ताफ्यातील अग्नीशामक दलाच्या गाडीने एका दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात नवरा-बायको आणि त्यांचे दोन लहान मुलं गंभीर जखमी झाले आहेत.घटना इतकी गंभीर असूनही, उपमुख्यमंत्री आणि त्यांच्या ताफ्याने थांबून जखमी कुटुंबाची चौकशी किंवा मदत न करत सरळ मार्गक्रमण केले. या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. मोठ्या माणसांच्या ताफ्यातून झालेला अपघात म्हणजे काहीच नसतं; गरीबांचा जीव स्वस्त मानला जातो, असे अनेकांनी प्रत्यक्षात व्यक्त केले.**

**या घटनेतून समाजाला प्रश्न पडतोः गरीब, सामान्य कुटुंबावर संकट आले की जबाबदार पदावरील व्यक्तीकडून तत्काळ मदत आणि चौकशी का होत नाही? प्रशासनकडूनही ताफ्यातील गाडीच्या जबाबदारीबाबत कोणतीही तत्काळ चौकशी किंवा स्पष्ट माहिती दिली गेली नाही.सामाजिक न्याय आणि जबाबदारी यांचा नियम प्रत्येक नागरिकासाठी समान असावा, हा मूलभूत विश्वास तुटतोय. या घटनेतून दिसते की, काही उच्च पदावरील लोकांच्या ताफ्यामुळे सामान्य माणसाचा जीव किती सहज दुर्लक्षित केला जाऊ शकतो, हे दुख्खदरीत्या समोर आले आहे.सरकार आणि प्रशासनाने तत्काळ या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, जखमी कुटुंबाला त्वरित मदत पुरवावी, आणि भविष्यात अशा प्रसंगांना रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. कारण प्रत्येक माणसाचा जीव, पद, संपत्ती किंवा समाजिक स्थिती पाहून कमी किंवा जास्त मोजला जाऊ नये.**

दैनिक आत्ताच एक्सप्रेस

**CHANGE OF NAME**

My Change Of Name
Old Name
My Name: **Chate Nikita Kanchan**
Father Name: **Kanchan Dasharathrao Chate**
Mother Name: **Shivkanya Kanchan Chate**
New Name
My Name: **Chate Nikita Kanchankumar**
Father Name : **Kanchankumar Dasharathrao Chate**
Mother Name: **Shivkanya Kanchankumar Chate**

दैनिक आत्ताच एक्सप्रेस

**CHANGE OF NAME**

My Change of Name
Old Name
My Name: **Chate Shivkanya Kanchan**
Spouse Name: **Kanchan Pasharathrao Chate**
New Name
My Name: **Chate Shivkanya Kanchankumar**
Spouse Name: **Kanchankumar Dasharathrao Chate**

## नागरिकांनी सजग आणि सतर्क राहून पान १ वरून..

कामा रुग्णालयातील ग्रेनेड हल्ल्यात गंभीर जखमी असूनही त्यांनी मागे न हटता अतिरेक्यांचा सामना केला आणि त्यांचा शेवट केला.शांतीदूत म्हणून काम करत असलेल्या आणि समाजामध्ये सकारात्मकता निर्माण करणाऱ्या रिलायन्स फाऊंडेशनच्या अध्यक्ष नीता अंबानी यांचा गौरव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच २६/११ हल्ल्यात अतुलनीय शौर्य दाखवणारे आणि 'जिंदा शहीद' म्हणून ओळखले जाणारे सुनिल जोधा यांनाही गौरवण्यात आले. श्री जोधा यांनी या हल्ल्यावेळी २० गोळ्या ज्यातील एक आजही त्यांच्या शरीरात आहे.या कार्यक्रमामध्ये पहलगाम हल्ल्यात जीव गमावलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांनाही सन्मानित करण्यात आले तसेच २६/११ या हल्ल्यातील शहिदांच्या कुटुंबीयांनाही सन्मानित करण्यात आले.

# काही कायदे बदलण्याची गरज?

कायदे...... अलिकडील काळात कायद्याला मोठे महत्व आलेले आहे व कायदे हे लोकांच्या बोकांडी बसत आहेत. असे दिसत आहे.देशात कायदे भरपूर आहेत व देशात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टींचे कायदे संविधानात नमूद आहे व हे संविधान डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले आहेत.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान लिहिलं. ते लिहायचा काळ होता सन १९४९. सव्वीस नोव्हेंबर हा संविधान लिहून पुर्ण करण्याचा दिवस. संविधान लिहून पुर्ण करायला दोन वर्ष, अकरा महिने व अठरा दिवस लागले.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान बनवलं. ते ज्यावेळेस बनवलं. त्यावेळेस भविष्याचा वेध, वर्तमानकाळ आणि भूतकाळात घडलेल्या घटना. या सर्व गोष्टींना विचारात घेवून बनवलं होतं. ज्यातून भविष्यात कोणत्या गोष्टी घडू शकतील व कोणत्या गोष्टीची गरज भासेल? याचाही संविधान लिहितेवेळी विचार केल्या गेला होता व तशी तरतूद करुन त्या तरतुदी संविधानात नमूद केल्या गेल्या. तसं पाहिल्यास डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे काही भविष्यवेत्ते नव्हते की येणारी परिस्थिती तशीच राहणार होती. ज्या आधारावर संविधान बनलं होतं. त्यासाठी त्यांनी संविधानात लवचीकता ठेवली व घटनादुरुस्तीची प्रक्रिया सांगीतली. ती प्रक्रिया घटनेच्या कलम ३६८ नुसार राबवली जाते. अन् त्याच प्रक्रियेनुसार आज घटनेत हवे तेव्हा हवे तेवढे बदल करता येतात. मात्र ते संसदेच्या अधीन राहून. संसदेत तशा प्रकारचा ठराव हा जनतेने निवडून आणलेल्या प्रतिनिधींसमोर मांडण्यात येतो. त्याच ठराव संसदेच्या दोन्ही सभागृहात चर्चा होते व ठराव संमत झाला की मतदान होवून तो ठराव राष्ट्रपतीच्या स्वाक्षरीसाठी पाठवला जातो. राष्ट्रपती महोदयांची त्व्वर स्वाक्षरी झाली की मग त्याचं रुपांतर अध्यादेशात होतं व तो अध्यादेश देशात कायदे रुपानं लागू होतं. एवढी कठीण प्रक्रिया आहे एखादा कायदा बनवितांना वा एखाद्या कायद्याला बदलवितांना. म्हणूनच सहजासहजी कोणीही देशातील १९४९ ला

बनविलेल्या व संविधानात अंतर्भूत असलेल्या कायद्यात बदल करण्याचा विचार करीत नाहीत. कारण असा बदल करीत असतांना जर एखादं विधेयक संसदेच्या एखाद्या सभागृहात पडलं वा अंतिम समयी राष्ट्रपती महोदयांनी स्वाक्षरीच केली नाही तर त्या विधेयकासाठी एवढा केला गेलेला खटापोह वा मेहनत ही वाया जात असते. याचा अर्थ असा नाही की कायद्यात बदल होवू नये. कायदे बदलू नयेत.

कायदे........ कायदा काही कोणाच्या आईवडिलांची जहांगीर नाही की तो बदलू शकत नाही. तो बदलू शकतो, जर आवश्यकता असेल तर. बदलत्या परिस्थितीनुसार माणूस बदलला. तो माकडापासून रुपांतरीत होवून माणूस बनला. सुरुवातीला तो झाडावर राहायचा. त्यानंतर तो जमीनीवर राहायला आला. तो जमीनीवर राहू लागला. त्याचबरोबर त्यानं आपलं हिंस्र प्राण्यांपासून संरक्षण कसं करायचं? याबाबत कला हस्तगत केली. तो खाणे, पिणे, घर बांधणे शिकला. एवढंच नाही तर आपल्या जीवांच्या संरक्षणासोबत आपल्या शरीराचं संरक्षणही शिकला. एकंदरीत सांगायचं झाल्यास बदलत्या हवामानानुसार तो आपले रहनसहन बदलवायला शिकला. आज त्याच्या घराचाच विचार केल्यास पुर्वी तो एखाद्या आयत्या बनलेल्या गृहेत राहायचा. आज तो स्वतः सिमेंटनं बांधलेल्या घरात राहतो. म्हणजेच बदलत्या परिस्थितीनुसार त्याच्यात बदल झाला. असे असतांना त्याने जे पुर्वी नियम बनवले होते. तेही बदलत गेले. बदलत्या परिस्थितीनुसार त्यानं हवे ते नियमही बनवले नव्हे तर नियमात बदल केला. असे असतांना कालचे सन १९४९ ला बनविलेले काही कायदे बदलण्याची गरज आहे. संविधानातील काही कायदे आज दुरुस्त करण्याची गरज आहे. ज्याचा त्रास नागरीकांना होतोय. जसे. विवाहासंबंधीचे कायदे. नियुक्तीसंबंधीचे कायदे. मजूरीसंबंधीचे कायदे व ङरासबंधीचे कायदे. महसूल कायदे. रहदारी संबंधीचे कायदे. प्राणीसंरक्षण कायदे. असे बरेच कायदे आहेत की ज्या कायद्यांना आज बदलशिण्याची गरज आहे. विवाह कायद्याचा विचार केल्यास सन १९४९ च्या काळातील बऱ्याचशा स्त्रिया या अज्ञानी त्यांना हवा तो आधार नसायचा. त्यातच त्या आपल्या पायावर उभ्या नसायच्या. म्हणूनच विवाहसंबंधीचे कायदे करतांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या कलम २५ अ नुसार खावटी प्रावधान घटनेत नमूद केलं. अन् ते बरोबरही होतं, त्यावेळची परिस्थिती पाहता. कारण एक पुरुष त्यावेळेस अनेक पत्नी करीत होते, आपल्या अस्तित्वात असलेल्या पत्नीची परवानगी न घेता. त्यातच जोर जबरदस्तीनं दुसरी पत्नी करताच पहिल्या अस्तित्वात असलेल्या पत्नीला सोडून देत होते. त्यावेळेस अशा पतीनं, परित्याग केलेल्या स्त्री समोर भीक मागणे वा आत्महत्या करणे. या दोन पर्यायाशिवाय दुसरा पर्याय नसायचा. आज तसं नाही. आज काळ बदलला आहे व आजची परिस्थिती तशी राहिलेली नाही. आज स्त्रिया पती अस्तित्वात असतांना दुसरा विवाह करतात आणि न्यायालयात आपल्थाला टती नाही असं सिद्ध करीत आयुष्यभर घटनेच्या कलम २५ अ अंतर्गत खावटी वसूल करीत असतात. आजच्या स्त्रिया स्वतः आत्मनिर्भर असूनही आपण आत्मनिर्भर नाही असा देखावा करतात. आजच्या स्त्रिया पुरुषांवरच अत्याचार करतात व सांगतात की आफण अतिशय लाचार आहोत. असं करुच शकत नाही. न्यायालय फक्त पुरावे पाहतो. असे पुरावे पुरुषांजवळ नसल्यानं पुरुष वर्ग फसतो. त्यामुळंच याही प्रकारच्या कायद्यात सुधारणा करण्याची गरज आहे. दुसरा कायदा आहे नियुक्तीसंबंधांचा. बाबासाहेबांनी संविधान लिहिलं, त्यावेळेसही खाजगी संस्थान होते व खाजगी संस्थानात कोणतेच कर्मचारी काम करायला पाहात नसत आणि एखादा कर्मचारी नियुक्त झालाच तर तो काही मालकांना ऐकत नसे. म्हणूनच नियुक्ती व निलंबनाचे अधिकार घटनेत कलमा टाकून बाबासाहेबांनी संस्थाधिशांकडे अबाधित ठेवले. कर्मचारी नियुक्त झाल्यानंतर त्यानं चांगलं वर्तन ठेवावं. हा उद्देश होता. अन् तसे ठेवणे बरोबरच होते. तसं पाहिल्यास त्यावेळचे संस्थाधीश हे अतिशय इमानदार होते. परंतु जसजसा काळ गेला. तसतसा संस्थाचालकांचा स्वभाव बदलत गेला व संस्थाचालकांनी निलंबन व नियुक्तीतून नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून बराच पैसा कमवला व ते कोट्याधीश बनले. आजही अशा नियुक्त होणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांना पन्नास लक्ष रुपये नियुक्तीसाठी द्यावे लागतात. तसंच आज चांगल्या वर्तनाला महत्व नाही. महत्व आहे, त्याचं संस्थाचालकासोबत पटण्याला. ते तेव्हाच पटतं. जेव्हा एखादा कर्मचारी संस्थाचालकासोबत चापलूस वा गुलाम पद्धतीने वागतो. जो नातेवाईक वा अशा स्वरुपाचा गुलाम असतो. त्यालाच नोकरीमध्ये स्थैर्य मिळते व पदोन्नत्या मिळतात. त्यामुळंच अशाही स्वरुपाचे कायदे बदलण्याची गरज आहे.

या झाल्या कर्मचारी समस्या व विवाह समस्या संबंधाच्या गोष्टी. देशात अशी बरीच प्रकरणं आहेत की जी प्रकरणं विचार करायला भाग पाडतात. जसे राशन देणे. कोणाला? जे खरंच गरीब आहेत त्यांना. परंतु आज राशन हे जे अतिशय श्रीमंत आहेत. दुचाकी, चार चाकी गाडी आहे, मोठमोठ्या इमारती आहेत. कितीतरी हेक्टर शेती आहे. तशीच अनेक लेकरं आहेत. त्यांनाही मिळतं. ज्यात सरकारी राशन हे सायकल असणाऱ्या, घर एकच आणि तेही झोपडं असणाऱ्या, मुलांमध्ये एकच लेकरु असणाऱ्या व शेतीमध्ये फक्त दोनच एकर शेती असणाऱ्या गृहस्थांना मिळायला हवे. परंतु त्याची शहानिशा न करता केवळ कागदपत्राच्या भरवशावर सगळं. दुसरी महत्वपुर्ण गोष्ट म्हणजे घरातील किरायेदाराचे नियम. कोणताही घर बांधणारा व्यक्ती. अतिशय मेहनत करुन घर बांधतो. माझ्या पोटापाण्याचं भविष्यात संगोपन व्हावं म्हणून कर्ज काढून घर बांधतो व दोन पैसे यावेत म्हणून त्या घरात किरायेदार ठेवतो व आयत्या बिळात नागोबा बसल्यागत संविधानातील कायद्यानुसार किरायेदार अकरा महिनेपेक्षा जास्त राहिल्यास त्याला सहजासहजी काढता येत नाही घरातून. त्यातच तो बारा वर्ष घरी राहिला तर घर त्याचं. तेच शेतीबद्दलही घडतं.

बिचारा शेतकरी अतिशय मेहनत करुन शेती घेतो व ती शेती त्याचं वय झाल्यावरही त्याला भाड्यानं चालवता येत नाही. कारण कायदे तसेच आहेत.

महत्वाचं सांगायचं झाल्यास असे बरेचसे कायदे आहेत की ज्या कायद्यात काही सुक्ष्म सुक्ष्म गोष्टी आहेत की ज्या गोष्टी आज काळानुसार बदलविण्याची गरज आहे. काहीजण जुन्या कायद्याचा लाभ घेत असून ते त्याच कायद्याचा गैरफायदा घेवून श्रीमंत बनत आहेत आणि काहीजण खऱ्या स्वरुपाचे वागूनही त्यांना जुन्या कायद्याचा अतिशय त्रास होत आहे. त्यातच काही कायदे धर्माबाबतही सहिष्णुता बाळगणारे नसून धर्माबाबत ढेदभाव करणारे आहेत. असे कायदे हे बदलत्या परिस्थितीनुसार बदलण्याची गरज आहे. जर बदलत्या परिस्थितीनुसार असे कायदे बदलले गेले नाही तर उद्या या कायद्यातून गैरफायदा घेणाऱ्यांची संख्या वाढेल. त्यांचाच बोलबाला होईल. कायद्यावरचा लोकांचा विश्वास उठेल व कायदे कुचकामी व निरुपयोगी ठरतील यात शंका नाही. तेव्हा वेळीच त्यावर सावधान होवून त्यातील कलमात हवी ती दुरुस्ती करण्याची गरज आहे. ज्यातून सर्वसामान्य जनता सुखी होवू शकेल. यात दुमत नाही.

**-अंकुश शिंगाडे नागपूर**

# विभागीय सॉफ्टबॉल स्पर्धेत रायझिंग स्टार स्कूलची चमकदार कामगिरी

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** क्रीडा व युवक सेवा संचालनालय छत्रपती संभाजीनगर विभाग आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय १९ वर्षांखालील मुले-मुलींच्या विभागीय सॉफ्टबॉल क्रीडा स्पर्धेत रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल, हरीसिद्धी माता नगर, हर्सूल या भागाने तृतीय क्रमांक मिळवून आपली उत्कृष्ट कामगिरी प्रदर्शित केली. ही स्पर्धा राजे संभाजी सैनिक शाळा, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर येथे पार पडली.

या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक अतुल निकम, उपमुख्याध्यापक संदीप चव्हाण आणि स्वाती निकम यांनी उपस्थित शिक्षक व विद्यार्थ्यांचा गौरव करत त्यांना पदक देऊन सन्मानित केले. याशिवाय वर्ग शिक्षक विजयसिंग ठाकूर, अमित मानकापे तसेच संस्थेचे अध्यक्ष मा.सुभाष निकम, सचिव अरुण निकम, मुख्याध्यापिका दीपाली वाकळे यांचाही उत्साहवर्धक सहभाग राहिला. त्यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले आणि या यशासाठी त्यांचे कौतुक केले.

शाळेच्या क्रीडा शिक्षक छखड राष्ट्रीय प्रशिक्षक संतोष आवचार यांचे मार्गदर्शन या संघासाठी अमूल्य ठरले. त्यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनामुळे खेळाडूंनी संघभावना, क्रीडा तंत्रज्ञान आणि स्पर्धात्मक मानसिकता यांचे उत्तम प्रदर्शन केले. संतोष आवचार यांनी संघातील प्रत्येक खेळाडूवर व्यक्तिगत लक्ष दिले, त्यांचे कौशल्य सुधारण्यासाठी विशेष सराव सत्रे आयोजित केली आणि संघात अनुशासन आणि संघभावना वाढवण्यावर भर दिला.या यशस्वी संघात मुलींचा समावेश खास उल्लेखनीय होता. ऋतुजा वैद्य, रागिणी डिगोळे, साक्षी दाभाडे, वेदिका ढाकणे, अनुष्का सूरडकर,




अमृता हिवराळे, अनुष्का पवार, प्रांजल थोरात, उत्कर्षा मुळे, सुप्रिया नवले, प्रलंशा सरकटे, राजलक्ष्मी पवार, सोनल बुधवत, कोमल ठाकूर, उत्कर्षा सरकटे आणि समृद्धी मानकापे यांनी संघाला जोशपूर्ण कामगिरी करून तृतीय क्रमांक मिळवून दिला. या खेळाडूंनी संघभावना, सामर्थ्य आणि चिकाटी यांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.शाळेच्या व्यवस्थापनाने या यशाबद्दल खूप आनंद व्यक्त केला असून, भविष्यातील स्पर्धांसाठी संघाचे सतत प्रोत्साहन करण्याचे आश्वासन दिले. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे रायझिंग स्टार इंग्लिश स्कूलने विभागीय पातळीवर आपली ओळख अधिक दृढ केली असून, या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत नवे अध्याय जोडले गेले आहेत.

# परराज्यातील शिक्षक देणार विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचे धडे- महत्त्वाचा व नाविन्यपूर्ण उपक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**
**अर्धापूर/प्रतिनिधी/** अर्धापूर शहरात व तालुक्यात शैक्षणिक क्षेत्रात अत्यंत कमी कालावधी मध्ये आपली एक वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या एज्युव्हीजन प्री-प्रायमरी व न्यू इरा किड्स इंग्रजी शाळेतील विद्यार्थ्यांना परराज्यातील शिक्षक इंग्रजी विषयाचे धडे देणार आहेत.सतत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती व उज्वल भविष्या संदर्भात विविध उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासंदर्भात अर्धापूर शहरातील नामांकित झालेली एज्युव्हीजन प्री प्रायमरी आणि न्यू इरा किड्स इंग्रजी शाळा अग्रेसर असते. अगदी त्याच धर्तीवर आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही पर राज्यातील मूळ इंग्रजी माध्यमातील शिक्षकांचा सहवास लाभावा यासाठी शाळेचे संचालक प्रा.प्रवीण रावते यांनी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणारे परराज्यातील शिक्षक यांचा शाळेत समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे.ग्रामीण भागातील पालकांचाही आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यम शाळेमध्ये शिक्षण देण्यासाठी एक पाऊल पुढे टाकत आहेत.परंतु दर्जेदार व उच्च शिक्षण मिळवण्यासाठी पालक आपल्या पाल्यांसाठी शाळांची निवड करत असतात.विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी संचालक यांनी आपल्या एज्युव्हीजन प्री प्रायमरी आणि न्यू इरा किड्स या शाळांमध्ये इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणाऱ्या परराज्यातील शिक्षकांची निवड केली असून त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्यासाठी व समजण्यासाठी सुलभ जाईल. त्याच बरोबर विद्यार्थी सहजतेने इंग्रजी बोलू लागतील व शाळेतील विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषे सोबतच इतर विषयांना सुद्धा स्वतंत्र विषय शिक्षक शिकविण्यासाठी आहेत.त्यामुळे विद्यार्थ्यांचे इंग्रजी भाषे सोबतच इतर भाषा व विषयांनाही परीपक्व करण्याचा मानस आमच्या शाळेचा आहे.विद्यार्थ्यांची शैक्षणिक विकासाबरोबरच शारीरिक व मानसिक विकास करण्यावरही तेवढाच भर शाळेचा असून विविध खेळांची माहिती व सर्वांगीण विकास करण्यासाठी शिक्षकांची नेमणूक केलेली आहे.

# रोटरी रेनबो क्लबतर्फे जालन्यात २७ व २८ नोव्हेंबर रोजी शिक्षण उत्सवाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना/ प्रतिनिधी/** शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असलेल्या रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोतर्फे इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी येत्या २७ व २८ नोव्हेंबर रोजी जेईएस महाविद्यालयात दोन दिवशीय एज्युफेस्ट अर्थात शिक्षण उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन व व्यक्तिमत्व विकासाबद्दल विविध तज्ञांच्या माध्यमातून उद्बोधन करणे, हा या उत्सवाचा उद्देश आहे.शिक्षण उत्सवाचे उद्घाटन २७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता जिल्हा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू पी. एम. यांच्या हस्ते होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून माध्यमिक शिक्षणाधिकारी श्री. खरात, रोटरीचे प्रांतपाल सुधीर लातुरे, माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू आणि डॉ. विजय जेथलिया यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमात अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांची प्रकट मुलाखत विद्यार्थी घेणार आहेत.

दोन दिवसीय उत्सवात सुभाष बोंद्रे, जगदीश कुडे, दीपक कोल्हे, सौ. ईश्वरी चव्हाण आणि जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.दोन दिवस सकाळी १० ते ४ या वेळेत हा उत्सव जाणार आहे. याप्रसंगी आयोजित करण्यात येणाऱ्या विज्ञान प्रदर्शनीत जनता हायस्कूल, शिवाजी हायस्कूल, सरस्वती भुवन, जैन विद्यालय, संस्कार प्रबोधिनी विद्यालय, सुरेखा प्राथमिक विद्यालय, सेंट मेरी स्कूल आदी १५ विद्यालयातील विद्यार्थी आपले प्रयोग सादर करणार आहेत.

# राज्यस्तरीय थ्रोबॉल स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा संघ नांदेडला रवाना

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/**दिनांक २२ ते २३ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत नांदेड येथे आयोजित होणाऱ्या राज्यस्तरीय थ्रोबॉल अजिंक्यपद स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा सबज्युनिअर मुलांचा संघ आज विशेष जल्लोषात रवाना झाला. जिल्ह्यातील या स्पर्धेसाठी संघाची निवड कौशल्य, कामगिरी व सातत्य लक्षात घेऊन करण्यात आली असून, या दौऱ्यावर संघासोबत प्रशिक्षक व व्यवस्थापकही आहेत.संघास शुभेच्छा देण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई, माजी क्रीडा अधिकारी गोकुळ तांदळे, क्रीडा अधिकारी खंडुराव यादव, क्रीडा अधिकारी राम मायंदे, वरिष्ठ लिपीक सदानंद सवळे, तसेच राष्ट्रीय प्रशिक्षक संतोष आवचार व आरेफ शेख यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. याशिवाय स्थानिक संघटन समितीचे मोहन शिंदे, गणेश बेटुदे, अजय देहाडे यांनीही संघाला प्रोत्साहन देत त्यांना यशस्वी होण्याच्या शुभेच्छा दिल्या.

संघात निवडलेले खेळाडू हे खालीलप्रमाणे आहेत - विवेक विश्वकर्मा, रेहान शेख, आदित्य चव्हाण, संदीप प्रजापती, सम्यक डोके, अरहान शेख, अनिकेत सदावर्ते, सोहम राजपूत आणि कुणाल नाईक. संघासोबत प्रशिक्षक म्हणून शैलेश कसबे व व्यवस्थापक म्हणून बिजू मारग आहेत.

संघाचे प्रशिक्षक शैलेश कसबे यांनी सांगितले की, संघाने गेल्या काही महिन्यांपासून नियमित सराव केला असून मुलांमध्ये उच्च स्पर्धात्मक वृत्ती आणि संघभावना विकसित केली आहे. याशिवाय व्यवस्थापक बिजू मारग यांनी संघाच्या सुरक्षेची व प्रवासातील सोयीसुविधांचा विशेष देखरेख घेतली आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी



बाजीराव देसाई यांनी या प्रसंगी संघाला प्रोत्साहन देत सांगितले की, संघाने आपले कौशल्य, मेहनत आणि चिकाटी दाखवून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे नाव राज्यस्तरावर उज्वल करावे. ही संधी मुलांसाठी केवळ स्पर्धा नाही, तर आत्मविश्वास वाढविण्याची आणि नवीन अनुभव मिळविण्याची सुवर्णसंधी आहे.सर्व उपस्थित मान्यवरांनी संघाचे उत्साहवर्धन केले आणि राज्यस्तरीय स्पर्धेत सर्वोच्च यश मिळावे ही कामना व्यक्त केली. आता छत्रपती संभाजीनगरचा संघ नांदेडमध्ये आपली तयारी पूर्ण करून स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी सज्ज झाला आहे.

# संक्षिप्त

## महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर-लातूर-नांदेड परिमंडलाचे यश



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/** अमरावती येथे नुकत्याच झालेल्या महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर-लातूर-नांदेड परिमंडलाच्या संघाने विविध क्रीडा प्रकारांत ९ सुवर्णपदके व ९ रौप्यपदके पटकावत उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन केले. तिन्ही परिमंडलातील पदकविजेत्या सर्व कर्मचारी खेळाडूंचा प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने यांच्या यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

महापारेषणच्या सभागृहात झालेल्या सत्कार समारंभास छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, महापारेषणचे मुख्य अभियंता जयंत विके, अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, बीना सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. राज्यस्तरीय स्पर्धेत सांघिक खेळात व्हॉलिबॉलमध्ये राघवेंद्र कापसे, ज्ञानेश्वर गाडेकर, बाळासाहेब ढगे, रियाज शेख, हामिद सय्यद, पवन सूर्यवंशी, फेरोज तांबोळी, गजानन निलपत्रेवार, परमेश्वर जाधव, किरण वीर, मनोज साळुंके व अमोल साळुंके यांनी सुवर्णपदक पटकावले. आशिष खानापुरे, रोहन श्रीरामवार, किरण पवार, गजानन राऊत व विशाल साळवे यांच्या चमूने टेबल टेनिसमध्ये सुवर्णपदक पटकावले. बॅडमिंटनमध्ये गुणवंत इप्पर, दीपक नाईकवाडे, रतनसिंग दुकानदार, सय्यद अकबर, ईश्वरसिंग टेलर यांनी रौप्यपदक पटकावले. कॅरममध्ये इक्बाल खान, सचिन केळकर, केशव लटपटे, प्रमोद चौरे व शाम वाघचौरे यांना सुवर्णपदक मिळाले. ब्रिजमध्ये दीपक माने, दिलीप पवार, सतीश गुडे, ललितादास देशपांडे, सुशील ढगे, सत्यम जयस्वाल यांना रौप्यपदक मिळाले. वैयक्तिक विजेते : गोळा फेक – श्रीकांत धोत्रे (सुवर्णपदक), भालाफेक – बालाजी कांबळे (सुवर्णपदक), बुद्धिबळ – पंकज देशमुख (सुवर्णपदक), कुस्तीच्या विविध वजनगटांत मतीन शेख यांनी सुवर्ण तर विजय जगताप, अमोल मुंगळे, बलराज अलाणे व वैभव पवार यांनी रौप्यपदक पटकावले. पॉवरलिफ्टिंगमध्ये रवी मिरगणे यांनी रौप्यपदक पटकावले. बॅडमिंटन दुहेरीत दीपक नाईकवाडे व गुणवंत इप्पर यांना रौप्यपदक मिळाले.

यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक जिवने यांनी खेळाडूंचे अभिनंदन करताना यापुढेही ते राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर महावितरणचे नाव उंचावतील, अशी अपेक्षा व्यक्त करून त्यांना सर्वतोपरी साह्य करण्याची ग्वाही दिली. उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील यांनी प्रास्ताविक केले. व्यवस्थापक (मा.सं.) डॉ.शिवाजी तिकांडे यांनी सूत्रसंचालन केले. जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड यांनी आभार मानले. कार्यक्रमास नांदेड परिमंडलाच्या उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मंजुषा पारिपेल्ली, कार्यकारी अभियंता प्रसाद महातोले, महेंद्र देशमुख, व्यवस्थापक संजय खाडे, बापू शिंदे, अविनाश चव्हाण यांच्यासह खेळाडू व कर्मचारी उपस्थित होते.

# मटनाचे दर गगनाला भिडले ; जनावर चोरी वाढली

## वडोद पोलीस ठाणे हद्दीत जनावर चोर सक्रीय; अवैध धंदेही वाढले

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री (प्रतिनिधी)** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार पोलीस ठाणे हद्दीत मागील काही महिन्यांपासून जनावरांच्या चोरीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. स्थानिक शेतकरी आणि रहिवाशांच्या मते, चोरट्यांची सक्रियता दिवसाढवळ्या दिसून येत आहे आणि पोलीस प्रशासनाला या प्रकरणात तातडीची कारवाई करणे आवश्यक आहे. विशेषतः, बकरी, बोकडे, गाय आणि बैल यांच्यावर चोरट्यांचे लक्ष केंद्रीत झाले आहे कारण या जनावरांचे मटणाचे दर सतत वाढत आहेत.

दिवसेंदिवस बकरी, बोकडे आणि इतर पाळीव जनावर चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे दिसत आहे. उदाहरणार्थ, दि. २२ नोव्हेंबर रोजी कोलते टाकळी येथील गट नं ३८५ मध्ये पांढऱ्या रंगाची बकरी शेतात बांधली असताना दोन गमच्छ बांधलेल्या व्यक्तींनी दुचाकीवरून येऊन ती बकरी चोरी केली. शेतकऱ्यांनी आरडा ओरड केला, पण चोर मोटारसायकलीवर फरार झाले. यासारख्या घटनांमुळे शेतकरी



आणि स्थानिक नागरिकांमध्ये चिंता आणि असुरक्षिततेची भावना पसरली आहे.

यापूर्वी बोरगाव आणि इतर गावांमध्ये गाय-बैल चोरीच्या घटनांवरून स्थानिक नागरिकांनी आंदोलन केले होते. अनेक जनावर अजूनही बेपत्ता आहेत, तर काहींच्या तक्रारी पोलीसांकडे दाखल झाल्या आहेत पण प्रभावी कारवाई करण्यात विलंब होत आहे. याशिवाय, विद्युत मोटर, पाईप आणि इतर शेतातील उपकरणांची चोरीही वाढली आहे. काही लोकांनी पोलीसांना मोटरची पावती दाखवली, त्यानंतरही खरे चोरीचे प्रकार कायम आहेत.

अवैध धंद्यांमध्येही वाढ झाली आहे. उमरावती, आळंद, पिरबावडा, बोधेगाव आणि आसपासच्या परिसरात अवैध पत्याचे क्लब आणि दारू विक्री सुरू आहेत. या ठिकाणी लाखो रुपयांचा गोरखधंदा चालतो, ज्यामुळे चोरीचे प्रमाण वाढण्याची शक्यता अधिक आहे. उमरावती गोसाई वस्ती आणि अंधारी रोड परिसरात अशा अवैध धंद्यांवर त्वरित लक्ष देण्याची गरज आहे.

स्थानिक नागरिक पोलीस प्रशासनाकडे अपेक्षा करीत आहेत की, चोरी आणि अवैध धंद्यांविरुद्ध तातडीने ठोस उपाययोजना करण्यात याव्यात. शेतकरी, नागरिक आणि पशुपालक यांना सुरक्षित वातावरण मिळावे, तसेच कायदा सुव्यवस्था टिकवण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गंभीर दखल घ्यावी. यासाठी नियमित गस्त, अवैध धंद्यांवर लक्ष ठेवणे, चोरीचे संशयित लोक पकडणे आणि समुदायासह संवाद साधणे गरजेचे आहे.

सध्या परिस्थिती गंभीर असून, वडोद पोलीस ठाणे हद्दीत बकऱ्या, बोकडे, गाय-बैल आणि अन्य जनावरांच्या चोरीवर तातडीने नियंत्रण ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच, शेतकऱ्यांना त्यांच्या मालमत्तेच्या सुरक्षेसाठी योग्य मार्गदर्शन आणि उपाययोजना पुरवली पाहिजेत.

## क्रीडा व युवक कल्याण विभागामार्फत ६,७ डिसेंबरला 'ग्लोबल युथ फेस्टिव्हल २५'

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/** शहरातील तरूणांसाठी ६ आणि ७ डिसेंबर रोजी जिओ वर्ल्ड गार्डन, वांद्रे येथे क्रीडा व युवक कल्याण विभागामार्फत श्रीमद राजचंद्र मिशन यांच्या सहकार्याने ग्लोबल युथ फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या उपस्थितीत हा सोहळा होणार आहे. यामध्ये १०,००० पेक्षा जास्त तरुण मन:शांती, ॲडव्हेंचर, आर्ट्स, कल्चर, संगीत, योग-ध्यान, समाजाभिमुख उपक्रम आणि (स्किल-बिल्डिंग) कौशल्य विकास यांसारख्या अनोख्या उपक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत.

क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या सहकार्याने, हा देशातील आघाडीचा युवक उत्सव ठरणार आहे. आत्मपरिवर्तनातून समाजपरिवर्तन घडवण्यासाठी हा उत्सव तरुणांची चळवळ म्हणून उभी राहील.लंडन आणि पुण्यासारख्या शहरानंतर ग्लोबल यूथ फेस्टिव्हल या वर्षी मुंबई येथे आयोजित करण्यात येत आहे. ग्लोबल यूथ कम्युनिटी ही २० पेक्षा जास्त देशांमध्ये आणि १७० पेक्षा जास्त शहरांमध्ये पसरलेली तरुणांची एक प्रेरणादायी चळवळ आहे. क्रिएटर्स, व्यावसायिक, कलाकार, उद्योजक आणि चेंजमेकर यांनी एकत्रित येऊन ग्लोबल यूथ कमिटी तयार केली आहे.हजारो लोकांना एकत्र आणणारे सायकलथॉनसारखे उपक्रम, ग्रामीण विकासासाठी केलेले अनेक प्रकल्प, आरोग्य, प्राणी-कल्याण, शिक्षण यांसाठी उभारलेले उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ मनोरंजन नसून प्रभाव आणि परिवर्तनाचा उत्सव ठरणार आहे.संगीत किंवा कला अशा एखाद्या विषयापुरते मर्यादित न राहता, ग्लोबल युथ फेस्टिवल हा समग्र अनुभव देणारा उत्सव आहे. महिला सक्षमीकरण, बालशिक्षण, ग्रामीण विकास, प्राणी-कल्याण, पर्यावरण संवर्धन यांसारख्या समाजोपयोगी उपक्रमांचे प्रात्यक्षिक देशातील सर्वात मोठा आऊटडोअर साउंड हीलिंग अनुभव, संगीत, कला, ध्यान, जर्नलिंग, पॉटरी, ड्रम सर्कल अशा मजेशीर पॉप-अप ॲक्टिव्हिटीज यांचा समावेश असणार आहे.


दैनिक आत्ताच एक्सप्रेस

**CHANGE OF NAME**

My Change Of Name
Old Name
My Name: **Chate Kanchan Pasharathrao**
Spouse Name: **Sukanya Kanchan Chate**
New Name
My Name: **Chate Kanchankumar Dasharathrao**
Spouse Name: **Shivkanya kanchankumar Chate**

दैनिक आत्ताच एक्सप्रेस

**CHANGE OF NAME**

My change of Name
Old Name
My Name: **Chate Siddhant Kanchan**
Father Name: **Kanchan Pasharathrao Chate**
Mother Name: **Shivkanya Kanchan Chate**
New Name
My Name: **Chate Siddhant Kanchankumar**
Father Name: **Kanchankumar Dasharathrao Chate**
Mother Name: **Shivkanya Kanchankumar Chate**


# जरंडी ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

आत्ताच एक्सप्रेस

जरंडी /प्रतिनिधी/जरंडी ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा सन्मान गुरुवारी (ता. २०) राज्याच्या उपसचिव सीमा जाधव यांच्या हस्ते जाहीर करण्यात आला. सुनील मंगरुळे यांनी आपल्या कार्यकाळात जरंडी गावाच्या शाश्वत विकासासाठी अतिशय महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली गावात पन्नास हजाराहून अधिक वृक्ष लागवड केली गेली, ज्यामुळे गावाचे पर्यावरण सुधारले आणि परिसर हिरवेगार झाला.

त्यांच्या कामगिरीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविणे आणि ग्रामविकासाच्या अनेक योजनांचा यशस्वी अंमलबजावणी करणे यांचा समावेश आहे. विशेषतः त्यांनी गावातील पिण्याच्या पाण्याची सोय सुधारणे, स्वच्छता अभियानांना चालना देणे, आणि सामाजिक तसेच शैक्षणिक उपक्रम राबविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. या सर्व योगदानामुळे त्यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रामपंचायत अधिकारी हा पुरस्कार देण्यात आला.



या सन्मानानंतर ग्रामपंचायत आणि तालुका पातळीवर अनेक नेते, अधिकारी आणि ग्रामस्थांनी सुनील मंगरुळे यांचे अभिनंदन केले. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळुंके, गटविकास अधिकारी शिवाजी यमूलवाड, विस्तार अधिकारी अशोक दौड, सरपंच स्वाती पाटील, फरदापुर सरपंच फतीमाबी पठाण, फिरोज चांदखा पठाण, माजी सरपंच समाधान तायडे, माजी पंचायत समिती सदस्य संजीवन सोनवणे, कृषी भूषण रवींद्र पाटील, वंदनाताई पाटील, दिलीप पाटील, मधुकर पाटील आणि इतर ग्रामस्थांनी यावेळी त्यांचे कौतुक केले.

या पुरस्कारामुळे सुनील मंगरुळे यांचे कार्यफळ अधिक प्रेरक ठरले असून, इतर ग्रामपंचायत अधिकारी आणि ग्रामीण विकासात कार्यरत व्यक्तींसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे. जरंडी गावाच्या विकासात त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे गावाचे सामाजिक, पर्यावरणीय आणि आर्थिक जीवनमान उंचावले गेले आहे.या संधीवर गावकरी आणि अधिकारी यांनी सुनील मंगरुळे यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# या घटनेचा निषेध करण्यासाठी पैठण तालुक्यातील सकल सुवर्णकार समाजाने एकत्र

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण /प्रतिनिधी/** माहितीनुसार, मालेगाव तालुक्यातील मौजे डोंगराळे येथील यज्ञा जगदीश दुसाने हिच्यावर अत्याचार करून तिची हत्या केली. या घटनेचा निषेध करण्यासाठी पैठण तालुक्यातील सकल सुवर्णकार समाजाने एकत्र येऊन माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि गृहमंत्री महाराष्ट्र शासन यांना निवेदन दिले. निवेदनात मागणी केली गेली की घटनेची जलदगतीने न्यायालयात सुनावणी होऊन एसआयटी स्थापन केली जावी, तसेच आरोपीवर झजडउज कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करून कठोर कारवाई केली जावी.




निवेदन पैठण पोलीस ठाणे मार्फत देण्यात आले, तसेच पैठण तहसील येथे कांबळे वैशाली निवडणूक नायब तहसीलदार यांच्या हस्ते ते स्वीकारण्यात आले आणि योग्य ती कार्यवाही केली जाईल अशी आश्वासने मिळाली. सुवर्णकार समाजाच्या नेत्यांनी या घटनेला मानवतेविरुद्धचा गुन्हा असल्याचे ठरवून, आरोपीस फाशीची शिक्षा व्हावी अशी भूमिका व्यक्त केली. कृष्णा लोळगे यांनी या प्रकरणावर आपली भावना व्यक्त करताना सांगितले की यज्ञा ही फक्त सुवर्णकार समाजाची कन्या नाही तर ती महाराष्ट्राची कन्या आहे आणि तिच्या हत्येचा संपूर्ण समाजाने निषेध करणे आवश्यक आहे.

यावेळी उपस्थित राहिलेल्या प्रमुख नेत्यांमध्ये व्यापारी महासंघाचे अध्यक्ष श्याम पंज्यावणी, योगराज बुदिले, प्रवीण उदावंत, गजानन उदावंत, अमोल डहाळे, बलराम लोळगे, पवन मैड, किशोर जोजारे, प्रशांत लोळगे, प्रवीण लोळगे, शांताराम दहिवाळ, अंबादास दहिवाळ, बाळासाहेब दहिवाळ, पुनित साराफ, दक्षेस सराफ, लालू शेठ, करण लोळगे, योगेश शहाणे, रोहित आंबिलवादे, आनंद डहाळे, अब्बास बंगाली, संजय शहाणे, अमित दाभाडे, शिवाजी पठाडे, किशोर दहिवाळ, अमोल मैड, नंदकिशोर बनसोडे, अशोक शहाणे, दत्ता बेद्रे, संदीप जोजारे, बंडू जोजारे, सतीश शेठ पवार, अभय टाक, शुभम बेद्रे, गणेश दहिवाळकर, अंकित चिंतामणी यांचा समावेश होता. त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या घटनेचा निषेध नोंदवला आणि न्यायाची मागणी केली.

या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये संताप आणि धैर्य वाढले असून, समाजातील प्रत्येक घटकाने बालकांच्या सुरक्षिततेसाठी सरकारने कडक पावले उचलली पाहिजेत असा संदेश दिला. बालिकेच्या हत्येप्रकरणावर तत्काळ कारवाई करून आरोपीला कठोर शिक्षा देण्यात यावी, तसेच अशा घटना पुन्हा होऊ नयेत यासाठी स्थानिक प्रशासन आणि पोलिस यंत्रणेला दक्षता वाढवावी असेही नागरिकांनी ठामपणे मागणी केली आहे.

# डोंगराळे तालुका मालेगाव येथे तीन वर्षाचे चिमुकलीवर अत्याचार व खून आरोपीवर तात्काळ कारवाईची मागणी

आत्ताच एक्सप्रेस

पिशोर / प्रतिनिधी/ मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथील तीन वर्षांच्या चिमुकलीवर झालेल्या अत्याचार आणि खूनाची घटना संपूर्ण महाराष्ट्रात धक्कादायक ठरली आहे. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी घडलेल्या या अमानुष कृत्यामुळे स्थानिक समाज तसेच राज्यभरातील नागरिकांमध्ये मोठी संतप्त प्रतिक्रिया निर्माण झाली आहे. या प्रकरणाने मानवी संवेदनांवर घाला घालून समाजात भीती आणि रागाची वातावरण निर्माण केली आहे.

घाटमाथा पत्रकार संघटनेतर्फे पिशोर पोलीस स्टेशनमध्ये सहाय्यक पोलिस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनात आरोपीविरुद्ध तात्काळ अटक करण्यासह कठोर शिक्षा-शिवाय फाशीची शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली आहे. पत्रकार संघटनेने स्पष्ट केले आहे की, अशा अमानुष घटना समाजासाठी गंभीर संदेश आहेत आणि गुन्हेगारांना कठोर शिक्षा होणे ही केवळ कायद्याची गरज नाही तर समाजाची अपेक्षाही आहे.

निवेदनात घाटमाथा पत्रकार संघटनेचे पदाधिकारी संतोष के. शिंदे, सुरेश जाधव, मुबीन पटेल, बापूसाहेब हरणकाळ, ज्ञानेश्वर दवंगे, कारभारी हराळ, सुनिल निकम, मिलिंद लांडगे, जावेद शेख, बापूराव रामकर, प्रकाश मैद, भागीनाथ मोकासे, राजेंद्र गोसावी, गणेश बनकर आदींच्या सह्या आहेत. त्यांनी प्रकरणात जलद कारवाई होण्याची आणि दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करण्याची मागणी जोरदारपणे व्यक्त केली आहे.

संघटनेने या घटनेचा निषेध करत म्हटले आहे की, केवळ पोलिस कारवाईवरच नाही तर समाजातील प्रत्येक घटकाने अशा घटनांविरुद्ध जागरूकता वाढवावी आणि




अपहृत, अत्याचारग्रस्त मुलांना सुरक्षित वातावरण मिळावे, हीही अत्यंत आवश्यक बाब आहे. पत्रकारांनी प्रादेशिक आणि राज्यस्तरीय माध्यमांमध्ये या प्रकरणाची माहिती दिली असून, गुन्हेगारांना जलद न्याय मिळावा आणि भविष्यात अशा अमानुष घटना टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची गरज असल्याचे अधोरेखित केले आहे.या घटनेने सामाजिक जबाबदारीची पुन्हा आठवण करून दिली आहे. स्थानिक प्रशासन, पोलिस आणि न्यायालय या प्रकरणात त्वरित आणि कठोर कारवाई करताच समाजात विश्वास आणि सुरक्षा भावना दृढ होईल, असे घाटमाथा पत्रकार संघटनेने नमूद केले आहे.

# नगरपालिका व नगरपरिषद निवडणुकीसाठी यंत्रणा सुसज्ज ठेवा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जिल्ह्यात होणाऱ्या नगरपालिका आणि नगरपरिषद मतदान प्रक्रियेसाठी नगरपालिका, पोलीस आणि महसूल या तिन्ही यंत्रणाने योग्य समन्वय ठेवून मतदान प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शक होण्यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घेऊन यंत्रणा सुसज्ज ठेवावी असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज आढावा बैठकीत दिले.जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दूरदृष्टी प्रणालीद्वारे जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी,तहसीलदार नगरपालिका मुख्याधिकारी यांच्याशी ऑनलाइन संवाद साधत निवडणूक यंत्रणेबाबतचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयातून नगरपालिका मुख्याधिकारी ऋषिकेश भालेराव उपस्थीत होते. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी संगीता राठोड ,पैठण फुलंब्रीच्या उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, कन्नड ,वैजापूर ,पैठण गंगापूर, सिल्लोड या नगरपालिकेचे मुख्याधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

मतदारांच्या मतदानाच्या दिवशी योग्य सेवा सुविधा देण्याबरोबरच मतदान केंद्रांची पाहणी आणि सुसज्जता याबाबत विशेष लक्ष द्यावे . त्यासाठी प्रत्यक्ष भेटी देऊन आदर्श आचारसंहिता बाबतचे पालन करण्यासाठी सर्वांनी काम करावे. जिल्ह्यात दुबार मतदार नोंदणी बाबत योग्य ती खबरदारी घ्यावी .यासाठी केंद्र अध्यक्षांना याबाबत विशेष प्रशिक्षण आणि सूचनाचेही निर्देश देण्यात यावेत असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी





सांगितले.


नगरपालिका निवडणूक नियमावलीप्रमाणे कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवत प्रतिबंधात्मक कारवाई आणि प्रत्यक्ष बंदोबस्त याबाबतचे नियोजन संबंधित नगरपालिका हद्दीतील निवडणूक प्रक्रियेच्या यंत्रणेने करावे. नियंत्रण कक्ष याबाबत विशेष काळजी घेऊन योग्य तो पोलिस बंदोबस्त मागवण्याचे नियोजनही करावे. मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन शाळा महाविद्यालयात करण्याबरोबरच मतदान करण्यासंदर्भाचे आवाहन प्रसार माध्यमाच्या माध्यमातून करण्यात यावे. यामध्ये स्थानिक कलाकार, विविध व्यक्ती यांचा सहभाग करून घ्यावा .पारदर्शकपणे निवडणूक होण्यासाठी रिस्पॉन्स टाईम किंवा प्रतिसाद वेळ हे कमीत कमी करण्यासाठीचा प्रयत्न करावा. निवडणुकीच्या प्रक्रियेत उमेदवार वेगवेगळ्या परवानग्यासाठी अर्ज करत असतात या अर्ज प्रक्रियेसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्राची यादी नगरपालिका कार्यालयाच्या दर्शनी भागात लावावे, जेणेकरून उमेदवाराला आवश्यक असणाऱ्या कागदपत्राची पूर्तता करून त्यांना परवानगी घेणे सुलभ होऊ शकते अशा सूचनाही जिल्हाधिकारी स्वामी यांनी केल्या. नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणूक विषयी प्रसार माध्यमाला वेळेत आणि अचूक माहिती देण्यासाठी माध्यम कक्ष उभारण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले.

# संक्षिप्त

## ज्ञानोबा-तुकोबांच्या पावन स्मृतींचा जागर: जालना येथे ऐतिहासिक वारकरी संत साहित्य संमेलन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)**वारकरी संप्रदायातील तीन महान संतांच्या



स्मृती जागवण्यासाठी १३ ते १५ डिसेंबर २०२५ दरम्यान जालना येथे ऐतिहासिक वारकरी संत साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. जेईएस महाविद्यालय व महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अमृतप्रवाहा' संमेलनाचा मुख्य उद्देश संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि संत तुकोबारायांच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या स्मृती समाजपर्यंत पोहोचवणे हा आहे.

त्रिवेणी संगमाचे महत्त्व:

-२०२५ हे वर्ष वारकरी संप्रदायासाठी विशेष आहे:

-संत ज्ञानेश्वर माऊलींचे ७५० वे जयंती वर्ष

-संत नामदेव महाराजांचे ६७५ वे संजीवन समाधी वर्ष

-संत तुकोबारायांचे ३७५ वे वैकुंठागमन वर्ष

संमेलनाध्यक्षपदी डॉ. रामकृष्णदास महाराज लहवितकर:ज्येष्ठ तत्त्वज्ञ व संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रामकृष्णदास महाराज लहवितकर यांची अध्यक्षपदी निवड झाली आहे. कुंभमेळ्यात त्यांना वारकरी संप्रदायाचे श्रीमहंत व महामंडलेश्वर पदवी प्राप्त आहे.

अध्यक्षांचे योगदान:डॉ. लहवितकर यांनी संत तुकोबारायांचा लोकसंवाद, तत्त्वज्ञान आणि काव्यशैली या विषयांवर पीएच.डी. केली आहे. त्यांनी 'संत तुकाराम महाराज विचारदर्शन', 'जगद्गुरु भक्तियोगी श्रीतुकाराममहाराजांचे सदेह वैकुंठगमन' यांसारखी मौलिक ग्रंथसंपदा निर्माण केली आहे. त्यांनी ९६५ मंदिरांची निर्मिती करून लोकशिक्षण, व्यसनमुक्ती, जलसंधारण, अस्पृश्यता निवारण अशा सामाजिक चळवळींमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. महाराष्ट्र शासनाने त्यांना ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार (२०१०) आणि व्यसनमुक्ती पुरस्कार (२००३) देऊन सन्मानित केले आहे.

सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व:संमेलनातून संत विचारांच्या प्रकाशात समाजमन उन्नत होईल, असा विश्वास आयोजकांचा आहे. जालना शहर आणि जिल्ह्यातील वारकरी व संत परंपरा मानणाऱ्या नागरिकांना संमेलनस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

संयोजन व स्वागत:जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरुषोत्तमजी बगडिया, सचिव श्रीनिवासजी भक्कड, स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, कार्यवाह डॉ. यशवंत सोनुने व संयोजन समितीच्या सर्व सदस्यांनी या संमेलनाचे आयोजन केले आहे.

# जालना जिल्ह्याच्या राजकारणात नवा मोड

## परतूरमध्ये रावसाहेब दानवे व बबनराव लोणीकर एका मंचावर

**आत्ताच एक्सप्रेस**

**परतूर/अंगद मुंडे/** जालना जिल्ह्याच्या राजकारणात आज एक ऐतिहासिक वळण पाहायला मिळाले, जे परतूर येथे झालेल्या भव्य भाजपा कार्यकर्ता मेळाव्यामुळे घडले. या मेळाव्यात माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे आणि परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी पहिल्यांदाच एका मंचावर एकत्र येऊन उपस्थित कार्यकर्त्यांसमोर आपले विचार मांडले. गेल्या काही महिन्यांपासून जिल्ह्यात सुरू असलेल्या राजकीय चर्चांना आणि गोंधळात गेलेल्या अंदाजांना या एका कार्यक्रमाने पूर्ण विराम दिल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

मेळावा आमदार बबनराव लोणीकर यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आला होता. या ठिकाणी हजारो कार्यकर्ते, स्थानिक नागरिक, आणि भाजपचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. स्वागत फलक, घोषणांचा गजर, बॅनर आणि झेंड्यांनी शहर राजकीय रंगात बुडालं होतं. मेळावा सुरू होताच घोषणांनी परिसर दणाणून गेला आणि उपस्थितांची उत्सुकता, जोश, व अभिवादन याने वातावरण प्रचंड उत्साही झाले.



रावसाहेब दानवे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत सांगितले की भाजपा ही संघटनात्मक मजबुती, शिस्त, आणि सेवाभावावर उभी राहणारी पक्षसंरचना आहे. त्यांनी जालना जिल्ह्यात आता खरी एकजूट प्रस्थापित झाल्याचे जाहीर केले आणि आगामी निवडणुकीत भाजप मोठा विजय मिळवणार असल्याचा आत्मविश्वास व्यक्त केला. त्यांनी एक महत्त्वपूर्ण राजकीय घोषणा करत सांगितले की परभणी लोकसभा मतदारसंघातून भाजप तिकीट बबनराव लोणीकर यांनाच मिळावे, यासाठी ते स्वतः प्रयत्न करणार आहेत. या घोषणेने उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह निर्माण केला.

यावर प्रतिक्रिया देताना आमदार बबनराव लोणीकर यांनी देखील मोठा निर्णय जाहीर केला. त्यांनी सांगितले की, ते आता परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघातून पुन्हा निवडणूक लढवणार नाहीत, तर आगामी निवडणुकीत परभणी लोकसभा मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढवून संसदेत प्रतिनिधित्व करणार आहेत. लोणीकर यांनी मतदारसंघातील विकासकामे, जनतेचा विश्वास, आणि कार्यकर्त्यांचे योगदान हेच त्यांच्या राजकीय बळाचे प्रमुख आधारस्तंभ असल्याचे स्पष्ट केले.

दोन्ही नेत्यांची एकत्रित उपस्थिती आणि केलेल्या घोषणांमुळे उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह आणि उमेद निर्माण झाला. कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमाला यशस्वी ठरवले आणि भविष्यात भाजप पक्ष आणखी बळकट होईल असा विश्वास व्यक्त केला. परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघ आणि परभणी लोकसभा मतदारसंघातील आगामी राजकीय समीकरणे आता पूर्णपणे बदलण्याची शक्यता वाढली आहे.राजकीय विश्लेषकांच्या मते, या कार्यक्रमामुळे जालना जिल्ह्यातील भाजपच्या पक्षाच्या आंतरिक एकतेवर स्पष्ट संदेश गेला आहे. आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत या घटनेचा परिणाम दीर्घकालीन राहणार आहे, तसेच स्थानिक आणि जिल्हास्तरीय नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये एक नवीन उर्जा निर्माण झाली आहे. हा मेळावा फक्त एक सामाजिक किंवा उत्साही कार्यक्रम नसून, राजकीय रणनीती आणि आगामी निवडणुकांसाठीची दिशा स्पष्ट करणारा ठळक टप्पा ठरला आहे.

# जामवाडी येथे संत भागीरथी माई पुण्यतिथी उत्सव भव्य स्वरूपात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जामवाडी गावातील संत भागीरथी माई यांच्या पुण्यतिथी उत्सव सोहळ्याला यंदा ऐतिहासिक उत्साह आणि श्रद्धेची अनोखी झलक लाभली. हा उत्सव प्रत्येक वर्षी गावातील आणि परिसरातील भाविकांसाठी अध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक एकतेचा महत्त्वाचा केंद्रबिंदू ठरतो. यंदा मुख्य आकर्षण ठरली पवित्र नारळाची पारंपरिक बोली, जिथे दीपक डोंगरे यांनी तब्बल १,०१,००० रुपये देऊन सर्वाधिक बोली लावली आणि यंदाचा मान मिळवला.

सकाळच्या सत्रात ह. भ. प. प्रभाकर महाराज सुरोशे यांनी संतवाणी, ओवी आणि काळ्याचे कीर्तन अतिशय भावपूर्ण रीतीने सादर केले. त्यांनी माईंच्या चरित्रातील महत्त्वाचे प्रसंग, समाजसेवेची शिकवण आणि भक्तिभावातून प्रसन्नता निर्माण करणारे विचार उपस्थित भक्तांसमोर मांडले. या सत्रामुळे उपस्थितांचे मन आध्यात्मिक आनंदाने आणि श्रद्धेने भारावले गेले. कीर्तनानंतर भक्तिरस ओतप्रोत वातावरणात हरिनाम आणि जय माईंच्या घोषणांनी संपूर्ण क्षेत्र गूंजले.

दहीहंडी फोडून पवित्र नारळ काढण्याची परंपरा यावेळी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बोलीची सुरुवात ११,००० रुपयांपासून झाली, मात्र काही क्षणांतच ती वाढत जाऊन ऐतिहासिक पातळी गाठली. दीपक डोंगरे यांनी आपल्या भावनिक उत्साहाने आणि कुटुंबाच्या माईवरील श्रद्धेने १,०१,००० ची सर्वोच्च बोली लावून सर्वांचे लक्ष वेधले. बोली तीन वेळा पुकारून थांबवली गेली आणि अधिकृतरित्या हा पवित्र नारळाचा मान दीपक डोंगरे यांच्या नावावर नोंदला गेला. ह. भ. प. योगानंद महाराजांनी त्यांना आशीर्वाद देताना कुटुंबकल्याण, समाजसेवा आणि अध्यात्मिक उन्नतीची प्रेरणा लाभो, अशी मंगलकामना व्यक्त केली.

मान स्वीकारताना दीपक डोंगरे भावूक झाले आणि म्हणाले, संत भागीरथी माईंच्या प्रसादाचा मान मिळणे ही माझ्यासाठी अत्यंत मोठी कृपा आहे. ही बोली केवळ आर्थिक किंमत नाही, तर आमच्या कुटुंबाची माईवरील सखोल श्रद्धा आहे. आम्ही सदैव सेवाभावाने



कार्य करत राहू. त्यांच्या या मनोगतातून संपूर्ण परिसरातील भक्तांमध्ये प्रशंसेची लाट उमटली.

संपूर्ण दिवस भजन, अभंग, कीर्तन, सांस्कृतिक कार्यक्रम, आणि पालखी सोहळ्याने उजळला. स्थानिक ग्रामस्थ, भागीरथी माई संस्था आणि स्वयंसेवकांच्या परिश्रमामुळे संपूर्ण उत्सव शिस्तबद्ध आणि सुचारू रीतीने पार पडला. पाण्याची व्यवस्था, प्रसाद वितरण, आरोग्य सेवा, वाहतूक नियोजन-सर्व व्यवस्था आदर्शपणे हाताळल्या गेल्या.

भोजनदानाच्या माध्यमातून माईंच्या सेवा ही खरी पूजा या संदेशाची जाणीव करून दिली गेली. संत भागीरथी माईंची पुण्यतिथी ही जामवाडी गावासाठी केवळ धार्मिक कार्यक्रम नाही, तर सामाजिक आणि सांस्कृतिक एकतेची जडणघडण करणारी परंपरा आहे.

यंदा दीपक डोंगरे यांच्या नावाने मिळालेला पवित्र नारळाचा मान उत्सवात विशेष उजळून निघाला आणि त्यांच्या कुटुंबाला संपूर्ण गावातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

भक्तिभाव, परंपरा आणि समाजसेवा या त्रिसूत्रीच्या संगमाचा अनुभव या उत्सवात प्रत्येक भाविकास मिळाला. जामवाडी गावाची ही अध्यात्मिक परंपरा आगामी पिढ्यांपर्यंत तेजाळत राहो, अशीच भावना हजारो भक्तांनी व्यक्त केली. यंदाचा उत्सव भक्तिभावाने, श्रद्धेने आणि आनंदाने नटलेला असून, पवित्र नारळाच्या ऐतिहासिक बोलीत दीपक डोंगरे यांच्या नावावर मिळालेला मान हा सोहळ्याचा मुख्य ठळक वैशिष्ट्य ठरला.

## हजरत टीपु सुलतान यांच्या जयंती निमित्त आष्टी येथे भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**आष्टी /प्रतिनिधी/**

हजरत टीपु सुलतान यांच्या जयंती निमित्त आज आष्टी येथे भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे आयोजन हाजी रहेमतखान पठाण यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. आरोग्य शिबिरामध्ये विविध प्रकारच्या वैद्यकीय तपासण्या, सल्ला व औषधोपचार मोफत करण्यात आले, जेणेकरून स्थानिक नागरिकांना आरोग्यसेवा सहज उपलब्ध होऊ शकेल.

शिबिराचे उद्घाटन प्रमुख व्यक्तींकडून केले गेले. या कार्यक्रमात आश्रोबा कडपे, डॉ. रोहित कासाट, आष्टीचे संरपंच मधुकर मोरे, उप संरपंच नसरुल्लाह खान काकड, नाजीम साहेब आणि मुफ्ती आलीम चौस उपस्थित होते. तसेच, डॉ. आर. के. सौदागर, मोसीन जमीनदार, मुर्तुजा चीचा, मोसिन बागवान, इमरान भाई चौधरी, वसीम पटेल, सुलतान पठाण, साबेरभाई मनियार, आजीम भाई कुरैशी, राजू कुरैशी यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौतम भाई शेळके यांनी अत्यंत सुसंगत पद्धतीने केले, तर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आभार प्रदर्शन वसीम शेख यांनी केले. शिबिरादरम्यान उपस्थित नागरिकांना रक्तदाब, रक्तातील शर्करा, नेत्र तपासणी तसेच सामान्य आरोग्य सल्ला मोफत देण्यात आला. स्थानिक लोकांनी या उपक्रमाचा उत्साहाने लाभ घेतला आणि आयोजकांचे आभार मानले.

हा आरोग्य शिबिर स्थानिक समाजातील आरोग्य जागरूकता वाढविण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा उपक्रम ठरला असून, भविष्यात अशा प्रकारच्या शिबिरांचे आयोजन नियमितपणे करण्याचा कार्यक्रम आयोजकांनी व्यक्त केला. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी या उपक्रमाची प्रशंसा केली आणि त्यास पुढील वर्षी आणखी मोठ्या प्रमाणात आयोजित करण्याची इच्छा व्यक्त केली.

# गोळेगावसह अनेक गावांत श्रमदानातून बांधलेले वनराई बंधारे

**आत्ताच एक्सप्रेस**

**आष्टी (प्रतिनिधी)** गोळेगावसह अनेक गावांत श्रमदानातून बांधलेले वनराई बंधारे हे शाश्वत विकासाच्या दृष्टीकोनातून महत्त्वपूर्ण उपक्रम ठरले आहेत. आष्टी तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये लोकसहभागाची चळवळ निर्माण करण्यासाठी व ग्रामीण भागातील जनतेच्या जीवनमान उंचावण्यासाठी हा कार्यक्रम राबविण्यात आला आहे. यामध्ये गोळेगावसह परिसरातील शेकडो ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घेतला असून, त्यांनी आपले श्रमदान देऊन अनेक वनराई बंधारे उभारले आहेत.

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान अंतर्गत हा उपक्रम राबविला जात आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश गावाचा शाश्वत विकास साधणे, ग्रामस्थांमध्ये सामाजिक उत्तरदायित्वाची भावना निर्माण करणे आणि लोकसहभागातून चळवळ निर्माण करणे असा आहे. जालना जिल्ह्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरित्या राबविला जात आहे.

यामध्ये तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर निवडलेल्या ग्रामपंचायतींना उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार देखील प्रदान केले जात आहेत, ज्यामुळे ग्रामस्थांमध्ये पुढील विकास उपक्रमांमध्ये सहभाग वाढतो.

गोळेगावमध्ये बांधण्यात आलेल्या वनराई बंधाऱ्यांच्या भूमिकेची माहिती अशी की, या बंधाऱ्यांमुळे पाणी साठवण्याची क्षमता वाढली आहे, जमिनीत आद्रता टिकवण्यास मदत झाली आहे व कृषी उत्पादन वाढीस लाभ झाला आहे. या कार्यक्रमात पंचायत समिती कृषी विभागाचे रोहनकर प्रशांत, एस एम अंभोरे विस्तार अधिकारी, जि सी बोडारे ग्रामविकास अधिकारी, एस के शेख, सरपंच उद्धव डोळस, उप सरपंच पवन बहिरे, उद्धव काटे, आबा साहेब सुरवसे, महादेव परळकर, अशोक पवार, मंजू वायाळ, ग्रा. प. कर्मचारी अख्तर




पठाण, बाबूलाल शेख, सादिक शेख, राजेभाऊ डोळस, कैलास मुळक तसेच शाळेचे शिक्षक काटकर यांनी सक्रिय सहभाग घेतला. तसेच विद्यार्थीही या कार्यक्रमाचा भाग बनून अनुभव घेत आहेत, ज्यामुळे युवा पिढीमध्ये समाजसेवेची जाणीव निर्माण होईल.

या उपक्रमामुळे फक्त पाणी साठवण्याची सुविधा वाढत नाही, तर जलसंधारण आणि पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीनेही मोठा लाभ होतो. ग्रामस्थांच्या सहभागातून उभा केलेला हा कार्यक्रम भविष्यातील शाश्वत ग्रामीण विकासासाठी आदर्श ठरत असून, या प्रकारच्या प्रकल्पांमुळे गावांमध्ये लोकशक्तीचा उपयोग कसा करता येईल याचे उत्तम उदाहरण निर्माण झाले आहे. भविष्यात अशा उपक्रमांना आणखी प्रोत्साहन देऊन, ग्रामीण भागात पाणी व्यवस्थापन, कृषी सुधारणा व समाजकल्याणासाठी नविन मार्गदर्शन मिळण्याची अपेक्षा आहे.

# 'बनगाव' ग्रामपंचायतीचे विभाजन; 'दहिगव्हाण (खु.)-बेलगाव' नवी ग्रामपंचायत

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड/ प्रतिनिधी /**

अंबड तालुक्यातील स्थानिक स्वराज्य व्यवस्थेत मोठा बदल घडवून आणण्यासाठी राज्य शासनाने बनगाव ग्रामपंचायतीचे विभाजन करण्याचा निर्णय अंतिम केला आहे. ग्रामविकास विभागाने २० ऑक्टोबर २०२४ रोजी जारी केलेल्या असाधारण अधिसूचना क्रमांक ४६९ नुसार, बनगाव ग्रामपंचायतीतून दहिगव्हाण (खु.) आणि बेलगाव या महसुली गावांचा समावेश करून नवीन स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यात आली आहे. हा आदेश शासनाचे उपसचिव क. श्री. पोतदार यांच्या स्वाक्षरीने निर्गमित झाला आहे.


पुनर्रचनेच्या प्रक्रियेला प्रशासनाकडून उच्चस्तरीय मार्गदर्शन मिळाले असून, कक्ष अधिकारी शुभम घुले, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी या प्रक्रियेचा सातत्याने पाठपुरावा करून आवश्यक प्रशासकीय स्तरांवर समन्वय साधला. विशेष म्हणजे, मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी अंबड तहसीलदार व पंचायत समिती अंबडच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे आवश्यक आदेशांचे पत्र काढून पुनर्रचनेची अंमलबजावणी तातडीने करण्याचे निर्देश दिले आहेत.

गावस्तरावर माहिती संकलन, मागण्या पुढे मांडणे आणि प्रस्ताव शासनापर्यंत पोहोचवण्याच्या प्रक्रियेत अशोक रंगनाथ शिंदे यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरले. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ग्रामपंचायतीच्या विभाजनाची मागणी शासनाकडे पोहोचली आणि त्यावर कार्यवाही झाली. तसेच, सध्याचे बनगाव ग्रामसेवक श्री. पगारे यांनी आवश्यक नोंदी, अहवाल आणि प्रशासकीय कागदपत्रांची तयारी करून प्रक्रियेला गतिमान केले.

दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या या पुनर्रचनेसाठी जिल्हा परिषदेची स्थायी समिती, महसूल प्रशासन व ग्रामविकास विभाग यांच्यामध्ये अनेक चर्चा झाल्या. त्यानंतर राज्यपालांच्या आदेशानुसार नवी रचना अमलात आली. यामुळे पूर्वी बनगाव ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात असलेला भौगोलिक परिसर आता दोन स्वतंत्र ग्रामपंचायतींत विभागला गेला आहे, ज्यामुळे प्रशासकीय कामकाज अधिक परिणामकारक होईल.

नवीन रचनेनुसार*

बनगाव ग्रामपंचायतीत फक्त बनगाव महसुली गाव




राहणार.दहिगव्हाण (खु.)-बेलगाव ग्रामपंचायतीत दहिगव्हाण (खु.) व बेलगाव ही दोन गावे सामील करण्यात आली आहेत.या बदलामुळे दहिगव्हाण (खु.) आणि बेलगाव गावांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. पूर्वी ते प्रशासकीय कामांसाठी बनगाववर अवलंबून राहावे लागत होते, परंतु आता दहिगव्हाण (खु.)-बेलगाव ग्रामपंचायतीच्या माध्यमातून स्थानिक प्रशासकीय कामे सहज आणि जलद होणार आहेत. दोन्ही गावे परस्परांपासून जवळ असल्याने विकासकामे अधिक सुलभ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. प्रशासनाच्या माहितीप्रमाणे, यामुळे गावस्तरीय सेवा वितरण, विकासकामांची गती, तसेच स्थानिक लोकांच्या अडचणींचे निराकरण जलद होईल.

२० ऑक्टोबर २०२४ पासून ही रचना अमलात आली असून लवकरच मतदारयादीचे विभाजन, प्रशासकीय हद्दींची नोंदणी व नवीन ग्रामपंचायत निवडणुकीची प्रक्रिया सुरू होणार आहे.

या पुनर्रचनेमुळे स्थानिक स्वराज्य व्यवस्थेची कार्यक्षमता आणि प्रशासनिक निर्णयक्षमता वाढेल, तसेच नागरिकांना त्यांच्या गावातच सेवांचा सहज लाभ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या सतत मार्गदर्शनाने आणि गावस्तरावर काम करणाऱ्या स्थानिक नेतृत्वाच्या प्रयत्नांमुळे अंबड तालुक्यात ही ऐतिहासिक पुनर्रचना शक्य झाली असून, यामुळे तालुक्यातील लोकशाही प्रक्रियेचा दर्जा अधिक बळकट होणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813